# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. १५१२/२०२२/अहमदनगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. महेश शरदराव बरवट, मु.पो.बोलकी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर ४२३६०३. | स्थापत्य अभियंता, बांधकाम विभाग, कोपरगाव नगरपरिषद कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर. | मुख्याधिकारी, कोपरगाव नगरपरिषद कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर. |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक – ०६/०२/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २०/१०/२०२० | २६/१०/२०२० | २७/११/२०२० | २३/११/२०२० | २५/११/२०२० | -------- |

अपिलार्थी यांनी दि. ०१/०२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "असमाधानकारक, अवाजवी व अतर्किक माहिती मिळाली " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस –अपिलार्थी online उपस्थित असून, अन्य पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

आपले सरकार पोर्टल वरील जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडे केलेल्या तक्रारी क्रमांक Dist/CLAH/२०२०/८२६४ दिनांक-२४/०६/२०२०, Dist/CLAH/२०२०/८५०८ दिनांक-२९/०७/२०२० व Dist/CLAH/२०२०/८८५२ दिनांक-१८/०९/२०२० नुसार कोपरगावातील राज्यमार्ग -१०- येवला नाका ते टाकळी फाटा या भागातील पथदिवे व रस्त्याच्या दुतर्फा व विभाजकात वृक्षरोपण करणेबाबत आपण काम हाती घेतले आहे, ऐसे तक्रारदार व जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहवाल देऊन कळविले आहे. आपण या विषयानुरुप केलेल्या कामांचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे सादर करावा.

१) राज्यमार्ग-१०-येवला नाका ते टाकळी फाटा या भागाच्या रस्त्याच्या पथदिव्यांच्या कामासाठभ् दिलेल्या निविदा, कार्यालयीन मान्यता, मंजुरीचे आदेश, मान्यता मिळालेल्या बाबत चा सभेचा ठराव व यासाठी खर्चाचा तपशील.

२) याच रस्त्या लगत दुतर्फा व विभाजकात वृक्ष लागवडी साठी दिलेली मंजुरी, कार्यालय आदेश, सभेचा ठराव, कामाचा एकूण खर्चाचा तपशील.

३) उपरोक्त मुद्दा १ व २ मधील कामांचे, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २(त्र)(१) नुसार प्रत्यक्ष कामाची पाहणी पुरविण्यात यावी.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " विहित मुदतीत माहिती न पुरवल्याने " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) अपिलार्थी यांनी दि.२०/१०/२०२० रोजी दाखल केलेला माहिती अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

२) अपिलार्थींनी दाखल केलेले दि.२५/११/२०२० रोजीच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०/१२/२०२० रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही.

३) अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केल्यानुसार प्रत्यक्ष कामाची पाहणी देखिल पुरविण्यात आली नाही.

४) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, बांधकाम विभाग, कोपरगांव नगरपरिषद कोपरगांव, यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे, त्यामुळे ते दंडात्मक कार्यवाहीस प्रथमदर्शनी पात्र ठरतात.

५) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, कोपरगांव नगरपरिषद कोपरगांव, यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला आहे, त्यामुळे ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस प्रथमदर्शनी पात्र ठरतात.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, बांधकाम विभाग, कोपरगांव नगरपरिषद कोपरगांव, यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र “अ” मध्ये मागणी केलेली उपलब्ध माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे तात्काळ विनामूल्य उपलब्ध

करुन दयावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीनी माहिती अर्जान्वये केलेल्या विनंतीनुसार त्यांना केलेल्या/ चालू असलेल्या कामांची पाहणी करण्याची संधी देखिल देण्यात यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, बांधकाम विभाग, कोपरगांव नगरपरिषद कोपरगांव, यांनी विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने त्यांचेविरुध्द कलम २० मधील तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तात्काळ आयोगास सादर करावा.

३) जिल्हाधिकारी, अहमदनगर, यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, कोपरगांव नगरपरिषद कोपरगांव, यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्याने, आदेश पारीत न केल्यामुळे अधिनियमातील कलम १९(६) आणि सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/ प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचा भंग केला असल्याची खातरजमा झाल्यास त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

वरील आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जिल्हाधिकारी अहमदनगर, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनांनुसार आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश सर्व संबंधितांवर बजावून त्याची दिनांकित पोच आयोगास सादर करावी.

जावक क्र. ओ-५६४ 6 MAR 2024